// कृषि महाविद्यालय
(डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला)
गडचिरोली-४४२६०५ महाराष्ट्र

डॉ. एम. एम. राऊत
सहयोगी अधिष्ठाता

फोन :(०७१३२)२२३०६१
फॅक्स:(०७१३२)२२३०६२
ई मेल :agricollegegadchiroli@gmail.com

जा.क्र.स.अ/आस्था/कृमवि/बाह्यस्त्रोकम/९५२/२०२४,        दिनांक : २४/०९/२०२४.

प्रति,

----------------------
----------------------
----------------------

विषय :- कृषि महाविद्यालय, सोनापूर-गडचिरोली येथे ०६ सुरक्षा रक्षकाच्या सेवा तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने ०६ महिन्याचे कालावधीसाठी सुरक्षा रक्षकाची उपलब्धता व दरपत्रके पुरविणेबाबत.

उपरोक्त विषयावरील अनुषंगाने कृषि महाविद्यालय, सोनापुर-गडचिरोली येथे तात्पुरत्या स्वरूपात ०६ सुरक्षा रक्षकाची सेवा ०६ महिने कालावधी करीता पुरविण्यासाठी प्रस्तावित आहे. सदर सुरक्षा रक्षकास कृषि महाविद्यालयाची मुख्य प्रशासकिय इमारत व त्यासमोरिल व मागिल बाजुचे परिसर, मुलांचे वसतीगृह व मुलींचे वसतीगृहात महिला सुरक्षा व्यवस्था पाहण्याचे कार्य पार पाडावयाचे आहे.

तरी सुरक्षा रक्षकाची उपलब्धता व दरपत्रक खालील दर्शविलेल्या अटी व शर्तीच्या आधिन राहुन या कार्यालयास पुरविण्यात यावे.

**अटी व शर्ती :-**

१) सुरक्षा रक्षकाची सेवा पुरवितांना अनुभव धारकांना प्राधान्य देण्यात यावे.
२) कृषि महाविद्यालय इमारत, प्रक्षेत्र, मुलांचे वसतीगृह व मुलींचे वसतीगृह यांचे सुरक्षतेची संपुर्ण जबाबदारी कंत्राटदार संस्थेवर राहील.
३) कराराचा कालावधी माहे. ऑक्टोंबर- २०२४ पासुन किंवा सेवा सुरू झाल्यापासुन ०६ महिन्यांकरीता राहील.
४) विद्यापीठ परीपत्रक दिनांक २२ जुन,२०२१ नुसार कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतन,विमा संरक्षण, भविष्य निर्वाह निधि,कॅशलेश पदधतीचा अवलंब इ. सुविधा पुरविणे बंधनकारक आहे.
५) आपले संस्थेमार्फत पुरविले जाणारे कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर/विद्यापीठावर राहणार नाही असा करारनामा रु.१००/- चे बॉंड पेपरवर करणे आवश्यक राहील.
६) आपले संस्थे मार्फत पुरविले जाणारे कंत्राटी कर्मचाऱ्यास दरमहा दहा तारखेच्या आत किमान वेतन कायद्यानुसार वेतन अदा करणे बंधनकारक राहील.
७) पुरवठाधारकांनी दरपत्रक सादर करते वेळी संस्थेचे नोंदणी क्रमांक, जिएसटी क्रमांक,पॅन क्रमांक याची नोंद करून आवश्यक त्या कागदपत्राची पुर्तता करणे बंधनकारक राहील.
८) सदर दरपत्रकात मासिक कालावधीचा दर नमुद करून सेवेचा कालावधी ०६ किंवा त्यापेक्षा कमी कालावधी निश्चित राहील, यात कुठलाही बदल ग्राह्य धरता येणार नाही.
९) कामाच्या वेळी सुरक्षा रक्षकास कोणत्याही प्रकारची इजा झाल्यास कृषि महाविद्यालय प्रशासन जबाबदार राहणार नाही.याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहिल.
१०) सदर दरपत्रक मा.सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, सोनापुर-गडचिरोली यांचे नावाने सिलबंद पॉकिटात सादर करतांनी लिफाफ्यावर सुरक्षा रक्षक च्या सेवा पुरविण्यासाठी दरपत्रक असे स्पष्ट नमुद करावे.

Scanned with CamScanner

११) सदर दरपत्रक दिनांक ०१.१०.२०२४ ला ५.३० वाजेपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी प्रत्यक्षात किंवा टपालाने प्राप्त होणे आवश्यक आहे. उशिरा प्राप्त झालेल्या दरपत्रकासंबंधी दावा ग्राह्य धरता येणार नाही.

१२) दरपत्रकासंबंधी दर मान्य करणे अथवा अन्य कारणास्तव दर रद्द करण्याचे अधिकार या कार्यालयाचे कार्यालय प्रमुखांना राहतील.

सहयोगी अधिष्ठाता
कृषि महाविद्यालय सोनापूर-गडचिरोली

Scanned with CamScanner